# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १०२-२२** **दिनांक :- ११/०४/२०२२**

## वृध्द तृतीयपंथीस मारहाण करुन सोन्याचे दागीने लुटणाऱ्या आरोपीस तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेने ठोकल्या बेड्या

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०१/०४/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजण्याच्या सुमारास तृतीयपंथी फिर्यादीचे घरी आलेला इसम नामे आया (पुर्ण नाव पत्ता माहित नाही) याने फिर्यादी झोपलेली असताना तीच्या गळयाला साडी गुंडाळली व त्यानंतर फिर्यादीस जाग येवुन त्या प्रतिकार करु लागल्या असता सदर इसमाने तीच्या तोंडात साडी कोंबली तसेच साडी हाताला गुंडाळुन तीला पलंगाला बांधले. पलंगाजवळ फिर्यादीचे एकुण ९,१७,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ठेवलेली लाल रंगाची पर्स फिर्यादीच्या संमतीशिवाय जबरीने चोरी करुन नेली. सदरबाबत फिर्यादी यांनी तुळींज पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन गु.रजि.नं २२५/२०२२ भादविस कलम ३९४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक पध्दतीने व गुप्त बातमिदारामार्फत मिळालेल्या माहितीवरुन नमुद गुन्हयातील आरोपीत नामे आयान रिझवान शेख, रा. फिरस्ता मुळ राहणार शिमोलतला पोस्ट मालदा, जि मुर्शिदाबाद, कोलकत्ता, राज्य पश्चिम बंगाल यास शिताफीने अटक करुन त्याचे कडुन ७,२१,०५० रु. किंमतीचे २४० ग्रॅम सोन्याचे दागिने व ८८,५००/- रु. रोख रक्कम, १ सॅमसंग मोबाईल असा एकुण ८,१०,५००/- रु किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात यश आले आहे. तसेच इतर दोन गुन्हयातील ५००० रुपये किंमतीचे २ भारत गॅसचे सिलेंडर व ६७० रुपये किंमतीचे सिगारेट पाकीटे असा एकुण ८,१६,१७० रुपये किंमतीचा मुद्देमाल आरोपीकडुन हस्तगत करुन तुळींज पोलीस ठाणे येथील १) गु.र.नं.२२५/२०२२ भादवी ३९४, २) गु.र.नं.५७/२०२२ भादवी ४५७,३८०, ३) गु.र.नं.२१०/२०२२ भादवी ४५७,३८० या ३ गुन्हयांची उकल करण्यात तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी श्री.संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, श्री.पंकज शिरसाट, सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि./मिथुन म्हात्रे, स.पो.उपनि./बाळु बांदल, शिवानंद सुतनासे, पो.हवा/अनिल शिंदे, आनंद मोरे, पो.शि./अशफाक जमादार, सुखराम गडाख, विनायक राऊत, इस्माईल छपरीबन यांनी केलेली आहे.

